## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २४ (          ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षातंर्गत ग्रॉएर ॲण्ड वेल (इंडिया) लि. या नामांकित कंपनीतर्फे घेण्यात आलेल्या परिसर मुलाखतीद्वारे सात विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

सरफेस कोटींग ॲण्ड पेंटससाठी प्रसिध्द असलेल्या ग्रॉएर ॲण्ड वेल (इंडिया) लि.या कंपनीची १९५७ मध्ये स्थापना झालेली आहे. देशभरात शंभर डिलर्स व वितरकांचे विक्री नेटवर्क असलेल्या या कंपनीचे ५० पेक्षा जास्त देशांमध्ये निर्यात केली जाते. मेटल फिनिशिंगमध्ये नामांकित असलेल्या या कंपनीने विद्यापीठात बी.टेक., एम.टेक (पेंट किंवा पॉलिमर) एम.एस्सी.(इंडस्ट्रियल, पॉलिमर व आर्गेनिक) पदवी प्राप्त विद्यार्थ्यांच्या परिसर मुलाखती घेतल्या. ४७ विद्यार्थ्यांची समुह चर्चा झाल्यानंतर ११ विद्यार्थ्यांची लेखी परीक्षेसाठी निवड झाली. लेखी परीक्षेतून सात विद्यार्थ्यांची अंतिम निवड करण्यात आली. कंपनीचे मनुष्यबळ व्यवस्थापक श्री.बलविदंर, संयुक्त उपाध्यक्ष महेश आराध्येय, उप व्यवस्थापक (संशोधन व विकास) हर्षल पाटील हे परिसर मुलाखतीसाठी उपस्थित होते.प्रा.विकास गिते यांनी या मुलाखतींचे आयोजन केले. सर्व निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील, प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, कुलसचिव भ.भा.पाटील व रसायनशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.धनंजय मोरे, केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाचे समन्वयक डॉ.भूषण चौधरी, प्रा.ए.बी.चौधरी यांनी अभिनंदन केले.

---

जा.क्र. : कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक : २४ जून, २०१९

प्रति,
मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी